# शिवाजी विद्यालयात सायबर सुरक्षेवर अभिनव कार्यशाळा

देशोन्नती 10-12-2022



अकोला ▪ डिजिटलायझेशनच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा सोबतच 'मोबाइल' ही मूलभूत गरज झालेली असून, इंटरनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये काही पटीनें वाढ झालेली दिसून येते. विद्यार्थ्यांमध्ये, सायबर गुन्हे आणि त्याबाबतची सुरक्षा याविषयी जागृती करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सायबर आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सहयोगाने, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक श्री शिवाजी विद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली होती.

महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स नेहा टेरे आणि शीतल साखरे यांनी कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी उपयोगी आणि उत्कृष्ट मार्गदर्शन केले. सायबर क्राइम कोणकोणत्या आणि कशा प्रकारे घडतात, वाढत्या सोशल मीडियाच्या वापरातून ऑनलाइन फसवणूक कशी होते, फ्री ॲप्सद्वारे डेटा कशाप्रकारे चोरी होतो याबाबत सविस्तर माहिती सांगितली. विविध ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे, कोणती दक्षता घ्यावी, मोबाइलमध्ये टू स्टेप व्हेरिफिकेशन करावे, ओटीपी इतरांना शेअर करू नये. एचटीटीपीएस वेबसाइट्सला व्हिजिट करावे, अँटिव्हायरस सॉफ्टवेअर इंस्टॉल करावे याबाबत माहिती सांगितली. यावेळी इंटरनेट, मोबइलचा योग्य वापर करण्यासाठी सर्वांना शपथ दिली आणि सायबर सुरक्षा टिप्स असलेले माहितीपत्रक उपस्थितांना वाटप करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय ठोकळ यांच्या परवानगीने आणि सहायक मुख्याध्यापक अमर देशमुख यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित केली होती.

कार्यशाळेचे नियोजन आणि संचालन लांडे यांनी केले तर ठाकरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.